ISSN 2349-638x

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-XII DEC. 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# "आश्रमशाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेचा अभ्यास"

**स्नेहल मोहन वडार**
संशोधक
शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विद्यानंद संभाजी खंडागळे**
(सहाय्यक प्राध्यापक)
शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील आश्रमशाळांचा शोध घेणे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेचा शोध घेणे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना प्रेरित करणाऱ्या आदर्शांचा शोध घेणे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी आदर्श व्यक्तितील प्रेरित करणाऱ्या गुणांचा शोध घेणे ही प्रमुख उद्दिष्टे असून प्रस्तुत संशोधनासाठी एकूण १७० मुलांची नमुना म्हणून निवड केली असून प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी प्रश्नावलीचा वापर केला आहे.

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून पुढील निष्कर्ष काढण्यात आले की, आश्रमशाळेतील मुला-मुलींचे पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. बँकिंग आणि पोलिस हे क्षेत्र निवडणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त आहे, तर इंजिनिअर आणि डॉक्टर हे क्षेत्र निवडणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी आई ही आदर्श असणाऱ्या मुला-मुलींचे प्रमाण जास्त आढळून आले. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी आदर्श व्यक्तितील कष्टाळूपणा हा गुण अधिक प्रेरित करतो, असे आढळून आले. आश्रमशाळेतील मुलांना शैक्षणिक महत्त्वकांक्षा पूर्ण करताना वैयक्तिक तसेच शैक्षणिक समस्या अधिक जाणवतात, असे आढळून आले.

## प्रस्तावना

शिक्षण म्हणजे सर्वांगीण परिपूर्ण विकासाचे मूळ आहे असे म्हटले जाते. शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ति, समाज व राष्ट्र समृद्ध परिपूर्ण स्वाभिमानी जीवन जगू शकणार नाही हे सर्वसामान्य झाले आहे. अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण हे व्यक्तिच्या मूलभत गरजा व हक्क आहेत. शिक्षणामुळे व्यक्तिमध्ये आत्मनिर्भरता येते. व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर परिणाम होतो. शिक्षणामुळे व्यक्तिंमध्ये विचारांची देवाण-घेवाण होत असते. अशाप्रकारची, संजीवनी तळागाळातील विमुक्त - भटक्या जाती - जमातींना न मिळाल्यामुळे या जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना टिकवून ठेवण्यासाठी शिक्षण हतबल झालेले आहेत. (मंडले, शैलजा (२००५) पान नं. ५०)

भारतीय समाजव्यवस्था ही विशिष्ट चाकोरीत अडकलेली आहे. आपली एक विशिष्ट जात-जमात, त्या जातीचा व्यवसाय, भाषा यांसारख्या गोष्टींच्या बाहेर गेलेलीच नव्हती. पण आज शिक्षणांमुळे विद्यार्थी जातीचा-जमातीचा व्यवसाय न करता, स्वतंत्र विचार करून विविध कामे करण्यास प्रवृत्त झाला आहे.

वैदिक कालखंडापासून ते आजच्या २१ व्या शतकापर्यंत समाजाने, शासनाने विविध स्तरावर आतापर्यंत बरेच प्रयत्न केलेले आहेत. याशिवाय भारतीय घटनेतील ४५ व्या कलमानुसार, सात ते चौदा वर्षाच्या मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे सार्वत्रिक व मोफत करण्यात आले आहे. तरीही दर्जेदार प्राथमिक व उच्च शिक्षण सर्व मुला-मुलींपर्यंत आणण्यासाठी सर्व स्तरावरील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे जे शिक्षणांपासून वंचित आहेत. त्या समाजाला म्हणजे आदिवासी, विमुक्त भटक्या जमातीतील मुला-मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे असा विचार सर्वप्रथम

गाडगेबाबांनी व्यक्त केला. त्याच्या विचारातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, यशवंतराव चव्हाण आणि वसंतरावजी नाईक यांना असे वाटले की, या मुला-मुलींना फक्त शाळांची सुविधा देऊन भागणार नाही तर त्यांना निवास, भोजन, शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य पुरविले तरच ते शिक्षणाकडे आकर्षित होतील आणि त्यातूनच जुन्या मुंबई राज्यात १९५३-५४ साली प्रथम आश्रमशाळा काढण्यात आली. सन १९६९-७० साली महाराष्ट्रातील आश्रमशाळांची संख्या ६८ झाली. त्यापैकी, ५८ गिरीजनांसाठी, ७ विमुक्त जमातींसाठी व ३ भटक्या जमातीसाठी होत्या. आरंभीच्या आश्रमशाळा इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या शिक्षण देणाऱ्या होत्या. कोठारी आयोगाच्या, सन १९६४-६६ आयोगातील शिफारशीप्रमाणे आर्थिक दुर्बल घटकांसाठी आश्रमशाळांची निर्मिती केली जावी: असे सूचित करण्यात आले. त्याप्रमाणे १९६७-६८ साली इयत्ता १ ली ते ११ वी पर्यंतच्या शिक्षण देणाऱ्या तीन उत्तर बुनियादी शाळांची संख्या ९ पर्यंत वाढविण्यात आली (कांबळे, जी. एस. (२००९), पान नं.२,३)

महाराष्ट्राखेरीज ओरिसा, केरळ, गुजरात, तामिळनाडू, राजस्थान व हिमाचल प्रदेश या राज्यातही आश्रमशाळा काढल्या असून त्यांची संख्या १९६३ साली सुमारे ६०० होती. अरूणाचल प्रदेश, आंध्र, आसाम, नागालँड व बिहार राज्यात अशा पद्धतीच्या आश्रमशाळा प्राथमिक शाळा सुरु करण्याची व शिक्षण बोलीभाषेत देण्याची सोय संबंधित राज्याने आखली आहे.

जनजाती, विमुक्त जमातीच्या भटक्या जमाती व इतर आदिवासी ह्यांच्या शैक्षणिक प्रगती करिता उघडलेली विद्यालये समान संधीच्या युगात काही जमातीपासून वंचित राहणे योग्य नाही. म्हणून शिक्षणांची वेगवेगळ्या स्तरावरची गरज लक्षात घेऊन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने अनेक आर्थिक सोयी सवलती देऊ केल्या आहेत. कोठारी आयोगात आदिवासी दुर्बल घटकांच्या शिक्षणासाठी सर्व राज्यांनी आश्रमशाळा सुरु कराव्यात अशी शिफारस केली आहे. सुरुवातीस आश्रमशाळा ह्या पूर्णत: शिक्षण खात्याच्या नियंत्रणाखाली होत्या नंतर ह्या शाळा मागासवर्गीयांच्या असल्यामुळे १/५/१९७५ पासून त्यांचे नियंत्रण समाजकल्याण विभागाकडे सोपवण्यात आले. त्यानंतर समाजकल्याण विभागात आदिवासी विकास विभागाची स्थापना झाल्यामुळे १/४/१९८५ पासून आदिवासीच्या आश्रमशाळांचे शैक्षणिक नियंत्रण शासनाच्या शिक्षण विभागाकडे आहे. आश्रमशाळा प्रशासनाची बाब विचारात घेता या प्रश्नांच्या आर्थिक प्रश्नांचे मालक समाजकल्याण खाते आहे. हे खाते शैक्षणिक ध्येये, उद्दिष्टे, अभ्यासक्रम, नियोजन, आणि कार्यवाही या बाबींशी सोयरसुतक मानीत नाही. (शेख, एम्. एस. (२०११) पान नं. ३३)

देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून ते आजपर्यंत शैक्षणिक धोरण राष्ट्रोद्धारास पोषक व्हावे म्हणून अनेक उपक्रम राबविले जातात. अज्ञान, दारिद्र्य यातून मुक्ती मिळवून देणे हेच शिक्षणाचे कार्य आहे. "सा. विद्या या विमुक्तये" प्रामुख्याने भटक्या-जमातीतील मुला-मुलींना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने आश्रमशाळा सुरू करून महाराष्ट्र शासनाने त्यांच्या जीवनात नंदनवन फुलवले आहे, त्यांच्या जीवनाला दिशा मिळाली आहे समाज विकासाच्या नव्या वाटचालीकडे झेपावत आहे. आश्रमशाळांनी आमूलाग्र क्रांती घडवून आणली आहे, शाळेपासून नव्हे तर गावकुसापासून दूर झालेला समाज शिक्षणाने एकत्र आणण्याचे कार्य समाजामध्ये आश्रमशाळेच्या माध्यमातून झाले आहे. समाजाला नवसंजीवन देऊन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात विकास करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. विद्यार्थी हा या समाजाचा एक घटक आहे. समाज परिवर्तनासाठी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा ही शासनाची भूमिका आहे. "शिक्षणाशिवाय व्यक्ती व समाजाचा विकास होत नाही, म्हणून भटक्या - विमुक्तांच्या शिक्षणांकडे लक्ष देण्यात येऊ लागले." भटक्या विमुक्त जाती - जमातीतील मुले शिक्षणाचा उपयोग करून जीवन उंचविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

ह्या आश्रमशाळेतील मुलांची जशी शिक्षणाची आवड निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे, त्यांच्या शिक्षणाबाबतच्या काही शैक्षणिक इच्छा, शैक्षणिक महत्त्वकांक्षा आहेत. आश्रमशाळेत त्यांना योग्य शिक्षण दिले जातेच व त्यांना नवनवीन जीवनमुल्येदेखील दिली जातात. ह्या मुलांचीदेखील मोठे होऊन काहीतरी बनण्याची इच्छा आहे. त्यांचे वेगवेगळे आदर्श आहेत. त्यांनादेखील शिक्षण घेऊन मोठे होऊन काहीतरी बनायचे आहे. आज आश्रमशाळेतील मुलांची उन्नती ओळखून त्याद्वारे ते शिक्षण घेतील. त्यांच्यामध्ये त्यांच्या ध्येयाच्या दृष्टीकोनातून शिक्षण घेण्याची वृत्ती वाढेल.

आश्रमशाळेतील मुलांना आपल्या महत्त्वकांक्षा कळण्यास मदत झाली तर ते शिक्षणाबद्दल अधिक जागृक होतील. विद्यार्थ्यांच्या आशा-आकांक्षा शिक्षाणमुळे पूर्ण होतील. विद्यार्थ्यांना आपल्या इच्छा, महत्त्वकांक्षा माहिती असतील तर हे विद्यार्थी वेगवेगळ्या स्तरावर काम करण्यास प्रेरित होतील त्यांना दिलेल्या शिक्षणामुळे ते यशस्वी होण्यास मदत मिळेल हाच ह्या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

### समस्या विधान

"आश्रमशाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेचा अभ्यास."

### पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

**१) आश्रमशाळा**

"ज्या शाळा वंचित समाजाच्या मुला-मुलींच्या शिक्षणांसाठी स्थापल्या गेल्या आहेत, अशा निवासी शाळांना आश्रमशाळा म्हणतात."

**२) माध्यमिक स्तर**

"आश्रमशाळेतील माध्यमिकचे इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे."

**३) विद्यार्थी**

"सन २०११-१२ चे माध्यमिक शिक्षण घेणारे इयत्ता ९ वी चे विद्यार्थी होय."

**४) महत्त्वकांक्षा**

"पुढील शिक्षण घेऊन काहीतरी बनण्याची इच्छा होय."

### संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. कोल्हापूर जिल्ह्यातील माध्यमिक आश्रमशाळांचा शोध घेणे.
२. आश्रमशाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेचा शोध घेणे.
३. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी प्रेरित करणाऱ्या आदर्शांचा शोध घेणे.
४. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षोसाठी आदर्श व्यक्तितील प्रेरित करणाऱ्या गुणांचा शोध घेणे.
५. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेच्यादृष्टीने आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांचा शोध घेणे.
६. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षा पूर्ण करताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

### संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन हे हातकणंगले, जयसिंगपूर, पेठवडगाव, रजपूतवाडी या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना लागू पडतील. आश्रमशाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेपुरतेच मर्यादित असेल. सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापुरतेच असेल.

### संशोधनाची परिमर्यादा

प्रस्तुत संशोधन हे कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर, हातकणंगले, पेठवडगाव, रजपूतवाडी या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे. माध्यमिक आश्रमशाळांतील सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापुरतेच मर्यादित आहे.

### संशोधनाची गरज

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अनुसूचित जातीचे, भटक्या-विमुक्त जातीतील असे विद्यार्थी आहेत. या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याशिवाय शिक्षणांमुळे माणसाच्या विचारात, अवस्थेत बदल होत आहेत. काळाच्या बदलानुसार आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्या प्रभावीपणे सोडविणे व त्यांना इतरांच्या प्रवाहात सामील करून शैक्षणिक प्रगतीमध्ये योग्य बदल होणे अपेक्षित आहे. त्यामुळे शैक्षणिक प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनांतून विद्यार्थ्यांना स्वत:ची शिक्षणाबाबतची ध्येये, महत्त्वकांक्षा असणे जरूरीचे आहे.

सदरच्या संशोधनातून विद्यार्थ्यांना आपल्या महत्त्वकांक्षा समजण्यास मदत होईल. त्यासाठी कोणते प्रयत्न करायला हवेत, हे समजेल. सदरच्या संशोधनातून विद्यार्थ्यांना आपल्या महत्त्वकांक्षा असायला हव्यात याविषयी समजण्यास मदत होईल. विद्यार्थी आपल्या महत्त्वकांक्षा निश्चित करून त्यानुसार शिक्षण घेतील.

### संशोधनाचे महत्त्व

शिक्षणाची वेगवेगळ्या स्तरावरची गरज लक्षात घेऊन शासनाने विशेष शाळा, आश्रमशाळा, निवासी शाळा, विशेष गरजा असलेल्या बालकांच्या शाळा इ. सारख्या शाळा सुरु केल्या आहेत. शिक्षणामुळे माणसाच्या अवस्थेत, विचारात परिवर्तन होते आहे हे संशोधन मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या महत्त्वकांक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. प्रशासन, शिक्षण, शिक्षण मंडळ आपल्या धडपडीतून योजना राबवित असतात. या योजना आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या महत्त्वकांक्षा पाहून राबविण्याच्या दृष्टीकोनातून हे संशोधन महत्त्वाचे आहे. आश्रमशाळांसाठी काम करणाऱ्या समाजकल्याण विभागास, अनेक संस्थांना विविध कामे राबविताना, विद्यार्थ्यांच्या महत्त्वकांक्षा माहिती असणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांची शिक्षणामध्ये आवड नसल्यास त्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते. त्यादृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे. आश्रमशाळेत अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षकांनादेखील विद्यार्थ्यांच्या महत्त्वकांक्षा माहिती असणे महत्त्वाचे आहे, त्यानुसार ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. विद्यार्थ्यांना आपल्या महत्त्वकांक्षा असण्याबाबतचे महत्त्व समजेल, शिक्षणबद्दल आवड निर्माण होईल.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या महत्त्वकांक्षा लक्षात घेऊन शासनाने विविध उपक्रम, कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीकोनातून हे संशोधन महत्त्वाचे आहे.

### सर्वेक्षण पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला.

### नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने कोल्हापूर जिल्ह्यातील ८ आश्रमशाळांपैकी हातकणंगले, जयसिंगपूर, पेठवडगाव, रजपूतवाडी या चार आश्रमशाळांची सहेतूक पद्धतीने निवड केली.

### संख्याशास्त्रीय परिमाणे

संशोधकाने मिळविलेली माहिती संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर करून त्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले. अर्थनिर्वचनासाठी 'टक्केवारी' (%) हे परिमाण वापारले.

### संशोधनाची कार्यपद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले, जयसिंगपूर, पेठवडगाव, रजपूतवाडी या शाळांची निवड करून त्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने मार्गदर्शकांच्या सहाय्याने प्रश्नावली तयार केली व ती विद्यार्थ्यांकडून भरून घेतली.

प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सांख्यिकीमधील टक्केवारीच्या साहाय्याने निरीक्षण व अनुमान काढले.

### निष्कर्ष

**उद्दिष्ट क्र. १** (कोल्हापूर जिल्ह्यातील माध्यमिक आश्रमशाळांचा शोध घेणे.)

कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ८ माध्यमिक आश्रमशाळा आहेत. त्यापैकी संशोधकाने ४ (हातकणंगले, जयसिंगपूर, पेठवडगाव, रजपूतवाडी) आश्रमशाळांची निवड केली.

**उद्दिष्ट क्र. २** (आश्रमशाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेचा अभ्यास करणे.)

१. आश्रमशाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षा आहेत, असे आढळून आले.
२. पुढील शिक्षण घेऊन इच्छिणाऱ्या मुला-मुलींचे प्रमाण जास्त आहे, असे आढळून आले.
३. बँकिंग आणि पोलीस हे क्षेत्र निवडणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त आहे, असे आढळून आले.
४. इंजिनिअर आणि डॉक्टर हे क्षेत्र निवडणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त आहे, असे आढळून आले.

**उद्दिष्ट क्र. ३** (आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी प्रेरित करणाऱ्या आदर्शाचा शोध घेणे.)

१. विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी प्रेरित करणाऱ्या आदर्शाचे प्रमाण जास्त आहे, असे आढळून आले.
२. उच्च शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी आई ही आदर्श असणाऱ्या मुला-मुलींचे प्रमाण जास्त आहे, असे आढळून आले.
३. आश्रमशाळेत शैक्षणिक महत्त्वकांक्षा गाठण्यासाठी पालक प्रेरित करतात, असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त आढळून आले.

**उद्दिष्ट क्र. ४** (आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी आदर्श व्यक्तितील प्रेरित करणाऱ्या गुणांचा शोध घेणे.)

१. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी आदर्श व्यक्तितील गुण प्रेरित करतात, असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त आढळून आले.
२. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेसाठी आदर्श व्यक्तितील कष्टाळूपणा हा गुण अधिक प्रेरित करतो, असे आढळून आले.

**उद्दिष्ट क्र. ५** (आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षेच्या दृष्टीने आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमाचा शोध घेणे.)

१. आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षा उंचावण्यास मदत व्हावी यासाठी विविध उपक्रम राबविले जातात, असे आढळून आले.
२. आश्रमशाळोत शैक्षणिक महत्त्वकांक्षा उंचावण्यास मदत व्हावी यासाठी; विविध स्पर्धांचे आयोजन, तज्ज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन केले जाते, असे आढळून आले.
३. आश्रमशाळेत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचा फायदा, शैक्षणिक महत्त्वकांक्षेस दिशा मिळण्यासाठी होतो, असे आढळून आले.

**उद्दिष्ट क्र. ६** (आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षा पूर्ण करताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.)

१. आश्रमशाळेत शैक्षणिक महत्त्वकांक्षा पूर्ण करताना विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या समस्या येतात, असे आढळून आले.
२. आश्रमशाळेत शैक्षणिक महत्त्वकांक्षा पूर्ण करताना मुलांना शैक्षणिक समस्या अधिक जाणवतात, असे आढळून आले.
३. आश्रमशाळेत शैक्षणिक महत्त्वकांक्षा पूर्ण करताना मुलींना वैयक्तिक समस्या अधिक जाणवतात, असे आढळून आले.

४. आश्रमशाळेत महत्त्वकांक्षा पूर्ण करताना येणाऱ्या समस्या विद्यार्थी मोठ्यांची मदत घेऊन सोडवतात, असे आढळून आले.

**चर्चा**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने "आश्रमशाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वकांक्षेचा अभ्यास" या समस्येबाबत संशोधन कार्य केले असून आलेल्या निष्कर्षांची चर्चा केली आहे ती पुढीलप्रमाणे -

या चर्चेमध्ये पूर्वी झालेल्या संशोधनाची उद्दिष्टे, निष्कर्ष व प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष, अनुमान यांच्यातील नोंदी केलेल्या आहेत.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्वकांक्षा आहेत त्यांना बँकिंग पोलीस, इंजिनिअर, डॉक्टर ह्या क्षेत्रांची आवड आहे. शिक्षण घेण्यासाठी आई ही आदर्श असलेली दिसून येते. सर्व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे. त्यांचे वेगवेगळे आदर्श आहेत. त्यापैकी आई ही मुले-मुली दोन्हीचे आदर्श असल्याचे प्रमाण अधिक आहे.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वेगवेगळे गुण प्रेरित करतात, त्यापैकी कष्टाळूपणा हा गुण अधिक प्रेरित करतो. शैक्षणिक महत्त्वकांक्षेच्या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम घेतले जातात. शैक्षणिक महत्त्वकांक्षा पूर्ण करताना मुलांना शैक्षणिक समस्यांना, मुलींना वैयक्तिक समस्यांना अधिक सामोरे जावे लागते पुरंदरे, व्ही. बी. यांच्या संशोधनात असे दिसून आले की, इ. स. १९८५-८६. मध्ये सुमारे ७६ विविध आश्रमशाळांमधून १५,००० विद्यार्थी शिक्षण आहेत. गुप्ता, एस. पी. यांच्या संशोधनातून असे दिसून आले की, आदिवासी विद्यार्थ्यांची संपूर्ण परिस्थिती असमाधानकारक होती, विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात तडजोडी स्वीकाराव्या लागतात. हंबीय, क. ता व देशमुख, न. दा. यांनी लिहिलेल्या लेखातून असे दिसून आले की, काही विद्यार्थ्यांच्या मते, शिक्षणामुळे आपल्या बुद्धिला चालना मिळते, हा विचार सर्व विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे गरजेचे आहे. ह्या मुलांची आवड लक्षात घेऊन तशाप्रकारचे शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. आश्रमशाळांमधून गुरुजन मुलांच्या विकासासाठी चांगले प्रयत्न करताना दिसत आहेत, आश्रमशाळेतील या मुलांना शहरी वातावरणाची नक्कीच गरज आहे.

Yun Zhou, Jennifer Glick यांनी केलेलया संशोधनातून असे दिसून येते की, पालकांच्या प्रोत्साहनामुळे शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांच्या महत्त्वकांक्षेत वाढ झाली. विद्यार्थ्यांच्या महत्त्वकांक्षा वाढण्यास पालक सहअध्यायी महत्त्वाची भूमिका बजावतात, पालकांचा सहभाग आणि कुटुंबात संवाद साधून सुद्धा विद्यार्थ्यांची महत्त्वकांक्षा जागृत करण्यास मदत करतात.

Suseela Devi Chandran यांनी केलेल्या संशोधनातून असे दिसून येते की, शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबतच्या महत्त्वकांक्षा होत्या पण त्यांना योग्य पूरक सोयी व वातावरण मिळाले नाही, विद्यार्थ्यांना शिक्षकांनी पालकांनी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**

कांबळे, जी. एस. (२००९). पुणे जिल्ह्यातील आश्रमशाळांची सद्यस्थिती एक
चिकित्सक अभ्यास. अप्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.
गाडे, एस. व्ही. (२००९). अमरावती जिल्ह्यातील मेळघाट विभागातील
आदिवासी विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त करताना येणाऱ्या अडचणी व उपाययोजना - एक सर्वेक्षणात्मक अभ्यास. अप्रकाशित शोधनिबंध, अमरावती विद्यापीठ.
गुप्ता, एस. पी. (१९६५). रांची जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचा अभ्यास.
अप्रकाशित शोधप्रबंध, The Bhiar Tribal Welfare Research Institute.
जाधव, एन. एल. (१९८३). नाशिक जिल्ह्यातील भटक्यांचा शैक्षणिक
विकास. अप्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.
देसाई, बी. गुजराथच्या आश्रमशाळांचा मूल्यमापनात्मक अभ्यास.

अप्रकाशित शोधनिबंध, C.T.R & T. Center, गुजराथ.
देशमुख, दा. न. व हंबीय, ता. क. (२००३, फेब्रु.). आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण: एक दृष्टीकोन, शिक्षण संक्रमण,
पंडित, बी. बी. (२००५). शिक्षणातील संशोधन. (संख्यात्मक आणि गुणात्मक). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
पुरंदरे, व्ही. बी. (१९७९). ठाणे जिल्ह्यातील आश्रमशाळांच्याप्रगतीचा व समस्यांचा अभ्यास. अप्रकाशित शोधप्रबंध, एस. एन. डी. टी. विद्यापीठ.
मुळे, रा. शं. व उमाठे, वि. तु. (१९७७). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मित मंडळ.
माने, लक्ष्मण. (२००५). भटक्या-विमुक्त जमातींच्या मुलांचे शिक्षण. साप्ताहिक जनप्रगती-दिवाळी शिक्षण विशेषांक, १०-१२.
मंडले, शैलजा. (२००५), विमुक्त व भटके विद्यार्थी : एक चिंतन. साप्ताहिक जनप्रगती-दिवाळी शिक्षण विशेषांक, ५०.
राठोड, मोतीराज. भारतीय संविधान आणि भटके विमुक्त जागतिकीकरणाचा अवकाश आणि परिवर्तनाच्या चळवळी (दलित मित्र व्यंकप्पा भोसले कार्यगौरव ग्रंथ). ३९-४१.
लोणकर, वा. म. (२००८). विदर्भातील इतर मागासवर्गीयांची विसाव्या शतकामधील शैक्षणिक प्रगती-एक अभ्यास. अप्रकाशित शोधप्रबंध, अमरावती विद्यापीठ.
शेख, एम. एस. (२०११). आश्रमशाळा - शिक्षण : दशा व दिशा. शिक्षण संक्रमण - दिवाळी शिक्षण विशेषांक, ३३-३६
सोहोनी, शं. कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश. पुणे: सोहोनी प्रकाशन.
Buch, M. B. (1972). Second Survey of Research in Education, Vol. I, New Delhi: NCERT.
Buch, M. B. (1988). Fouth Survey of Research in Education, Vol. I, New Delhi: NCERT.
Zhou, Y. J. (2011). Glick – Encourag for Educational Aspiration.
The Role of Parent & Counselors When Explaning. Group Arizona State University. Retrieved Aug 15, 2011 from htpp://www.upena.uitm.edumy/publications/jol/v3jun2006/2pdf.